पुण्य नगरी



# आयमात आयोजित मेळाव्यात १५० जणांना मिळाला रोजगार

अंबड : अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (आयमा) व जिल्हा कौशल्य विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रोजगार मेळाव्यात सुमारे १५० उमेदवारांना रोजगार मिळाला.

मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी आयमाचे अध्यक्ष ललित बुब, नाशिक जिल्हा कौशल्य विकासचे सहाय्यक आयुक्त विजय रिसे, राजू गाढवे, आयमाचे सरचिटणीस प्रमोद वाघ, बीओपीपी चेअरमन ज्ञानेश्वर गोपाळे, एचआर कमिटीचे चेअरमन धीरज वडनेरे, युवा सेल कमिटीचे चेअरमन अभिषेक व्यास, को.चेअरमन नागेश पिंगळे आदी होते.

आयमाच्या गेल्या ३७ वर्षांच्या इतिहासात प्रथमच असा रोजगार मेळावा झाल्याचे अध्यक्ष ललित बूब यांनी सांगितले. कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त विजय रिसे यांनी गुणवत्ता असलेल्या सर्वांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनातर्फे पावले उचलली जात असल्याचे नमूद केले. लूसी ग्रुपचे राजू गाढवे यांनी दर तीन महिन्यांनी असा मेळावा आयोजित करावा, असे आवाहन केले.

यावेळी उपाध्यक्ष राजेंद्र पानसरे, उपाध्यक्ष उमेश कोठावदे, खजिनदार गोविंद झा, सचिव योगिता आहेर, हर्षद बेळे, दिलीप वाघ, हेमंत खोंड, रवींद्र झोपे, निमाचे उपाध्यक्ष मनिष रावल, राहुल गांगुर्डे, जयंत पगार, कुंदन डरंगे, श्रीलाल पांडे, विनोद कुंभार, रणजित सानप, सुरज आव्हाड, प्रतीक पगार, शरद दातीर आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन नागेश पिंगळे यांनी केले, तर आभार प्रमोद वाघ यांनी मानले.

Nashik Edition
Jul 17, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com


Rise
लिमीटेड